मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर यांच्या आस्थापनेवर लघुटंकलेखक-१ व लिपिक-टंकलेखक-१अशी एकूण ०२ पदे निर्माण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय: मुसाना-२०२३/३७/प्र.क्र.२६/का.८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई: ४०००३२.
दिनांक: ०२ एप्रिल, २०२४

वाचा:- १) विधि व न्याय विभाग, शासन निर्णय, क्र.संकिर्ण २८१६/प्र.क्र१९१(भाग १)/१६/का.८, दि.१८ एप्रिल, २०२३
२) मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर, यांचे पत्र क्र.२९७४/आस्था/२०२२, दि. १९ डिसेंबर,२०२२
३) उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि. ३० नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. पदनि-२०२३/प्र.क्र.६३/आपुक, दि. ३ जानेवारी,२०१४

प्रस्तावना:-

विधि व न्याय विभाग, शासन निर्णय, दि.१८ एप्रिल, २०२३ अन्वये कार्यासन-८ च्या अधिपत्याखालील १३ सरकारी वकील कार्यालयांच्या आस्थापनेवरील पदांचा सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला आहे. सदर सुधारित आकृतीबंधानुसार मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर या कार्यालयाकरिता विविध संवर्गातील ५ नियमित पदे मंजूर असून गट-ड संवर्गातील एका पदाची सेवा बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर कार्यालयातील अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे कार्यालयीन व न्यायालयीन कामकाजात वारंवार अडचणी निर्माण होत असल्यामुळे या कार्यालयाकरिता लघुटंकलेखक-२ पदे, लिपिक-टंकलेखक-२ पदे आणि शिपाई -२ पदे अशी एकूण ६ पदे नव्याने निर्माण करण्याचा प्रस्ताव संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर यांनी सादर केला होता.त्यानुषंगाने वित्त विभागाने व उपसमितीने दिलेल्या मान्यतेनुसार, या कार्यालयाकरिता लघुटंकलेखक १ पद व लिपिक-टंकलेखक १ पद अशी २ पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीच्या दि. ३० नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास उच्चस्तरीय सचिव समितीने मान्यता दिलेली आहे.

शासन निर्णय:-

उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि. ३० नोव्हेंबर, २०२३ रोजी पार पडलेल्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार, मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर या कार्यालयाकरिता खालील तत्क्यात दर्शविल्याप्रमाणे लघुटंकलेखक-०१ पद व लिपिक-टंकलेखक-०१ पद अशी एकूण २ पदे निर्माण करण्यास व विहित पद्धतीने भरण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | लघुटंकलेखक | १ | एस-८ २५५००-८११०० |
| २ | लिपिक-टंकलेखक | १ | एस-६ १९९००-६३२०० |

२. सदर पदाच्या निर्मितीसाठी येणारा खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय उच्चस्तरीय सचिव समितीने दि. ३० नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार व वित्त विभागाने अनौ.सं. क्र. अनौसो ६५/आपुक, दि.२५.०१.२०२४ व अनौ. सं. क्र.८२/सेवा-९, दि. ०६.०२.२०२४ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून, त्याचा सांकेतांक क्र. २०२४०४०२१६१७४५२७१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWATI LOHAR

Digitally signed by SWATI LOHAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=LAW AND JUDICIARY DEPARTMENT,
2.5.4.20=eaef1faf1fb5262ec7b0737903120dfa387867f017650e284f3e90868f26d12d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AB72B061785AE0359686D1C8A0DDB0F52744A155BE1924D6AB3706E1DE7E60EC, cn=SWATI LOHAR
Date: 2024.04.02 16:27:28 +05'30'

**(स्वा.सु.लोहार)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) सचिव व वरिष्ठ विधि सल्लागार, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
४) सह सचिव, कार्यासन-८, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर
६) अधिक्षक, मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर
७) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
८) कक्ष अधिकारी, विधि व न्याय विभाग (कार्यासन-२३), मंत्रालय, मुंबई.
९) कक्ष अधिकारी, (आपुक/व्यय-५), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवड नस्ती (कार्यासन-८).